पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

दिनांक - **०४/०५/२०२०** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०४/०५/२०२०** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.अश्विनी भिमा बोबडे - सभापती**
२. मा.घोलप कमल अनिल
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.अनुराधा गणपत गोरखे
६. मा.उषा संजागे वाघेरे(पाटील)
७. मा.काळे उषा दिलीप
८. मा.सुलक्षणा राजू धर
९. मा.प्रमोद कुटे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) सन्मा.नगरसदस्य / सन्मा.नगरसदस्या यांच्या रजा मंजूर करणेबाबत. – मा.सुलक्षणा धर , मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर मध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये म्युरल्स बसविणे व सुशोभिकरणाची कामे करणेबाबत. – मा.कमल घोलप , मा.अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर पदोन्नती देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत. – मा.अनुराधा गोरखे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

**----------**

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

**सुचक –** मा.सुलक्षणा धर अनुमोदक – मा.मनिषा पवार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विधी समितीची दिनांक ०४/०५/२०२० ची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०८/०५/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

**सभापती -** शुक्रवार दिनांक ०८/०५/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १५

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०४/०५/२०२० ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०८/०५/२०२०** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.०४/०५/२०२० ची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **०८/०५/२०२०** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.अश्विनी भिमा बोबडे** - **सभापती**
२. मा.घोलप कमल अनिल
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.अनुराधा गणपत गोरखे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.राजेश आगळे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – प्रशासन
सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३७८/२०२० दि.१८/०३/२०२०

विषय - पिं.चिं.महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील पदव्युत्तर संस्थेकरीता स्थायी आस्थापनेवरील गट – अ सवंर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेबाबत.

**विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**----------**

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक - ०२
दिनांक – ०८/०५/२०२०
सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.मनिषा पवार

कोरोना विषापणूचा(COVID-19) प्रदादूर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून तसेच महानगर पालिकेमार्फत विविध उपाय योजना राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने शासनाचे जमावबंदी/

संचारबंदी आदेश विचारात घेता माहे मार्च २०२० आणि एप्रिल २०२० या दोन महिन्यांमध्ये मा.महापालिका सभा तहकूब करण्यात आल्या आहेत. करोना विषाणूचा(COVID-19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाने जमावबंदी / संचारबंदी लागू केली असल्याने ब-याचशा सन्मा.सदस्य / सन्मा.सदस्या यांना मा.महापालिका सभांना माहे मार्च २०२० आणि माहे एप्रिल २०२० मध्ये उपस्थित राहता आले नाही. अशा सर्व सन्मा.नगरसदस्य आणि सन्मा.नगरसदस्या यांच्या माहे मार्च २०२० आणि माहे एप्रिल २०२० च्या रजा मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच या कालावधीमध्ये मा. विशेष समित्यांच्या काही सन्मा.सदस्यांना देखील मा.विशेष समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहता आले नसल्याने त्यांच्या रजा मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०८/०५/२०२०

सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर मध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये म्युरल्स बसविणे व सुशोभिकरणाची कामे करणे(निविदा क्र.१०१/१/२०१७-१८) या कामातुन र.रु.१४,६५,०००/- रक्कमेचे म्युरल्सचे काम इ.क्षेत्रिय कार्यालयाच्या मागील स्केटिंग रिंक मैदान येथे करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०८/०५/२०२०

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.मनिषा पवार

श्री.सुरेश पुंडलिक साळुंके , मुख्य उद्यान अधिक्षक हे माहे फेब्रुवारी २०२० अखेर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले असून सदरचे पद रिक्त झालेले आहे. सदर मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर उद्यान अधिक्षक पदावरील कार्यरत कर्मचा-यांपैकी श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड, उद्यान अधिक्षक हे सेवाजेष्ठ असुन सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत आहेत. तरी मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड(उद्यान अधिक्षक) यांची पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१७१/२०२०
दिनांक : ०८/०५/२०२०



**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.